# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 08 January 2026

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०८ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

केंद्रीय गृह मंत्रालयानं जनगणना–२०२७ च्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना जारी केली आहे. या टप्प्यात यावर्षी एक एप्रिल ते ३० सप्टेंबर या काळात घराघरांत जाऊन माहिती संकलन केलं जाणार आहे. प्रत्येक राज्यात ३० दिवसांच्या निश्चित कालावधीत हे काम होईल, तसंच त्याआधी १५ दिवस स्वयं-गणती करण्याचीही सोय उपलब्ध असेल. या जनगणनेत प्रथमच डिजिटल पद्धतीने मोबाईल ॲपद्वारे माहिती नोंदवली जाणार आहे.

****

निवडणूक प्रशिक्षणाला गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करावी असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत. महानगरपालिका निवडणुकांसाठी मतदान आणि मतमोजणीची तयारी तसंच कायदा सुव्यवस्थेसंदर्भात सर्व २९ महानगरपालिका आयुक्त, संबंधित पोलिस आयुक्त आणि जिल्हा पोलिस अधीक्षक, त्याचप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची गेले दोन दिवस दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. मतदान आणि मतमोजणीची प्रक्रिया सुरळितपणे पार पाडण्यासाठी सर्वांचं प्रशिक्षण होणं आवश्यक आहे. मतदान केंद्रांवर विविध व्यवस्था करण्याबाबतही सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांना अवगत करावं, मतदानासाठी येणाऱ्या मतदारांची गैरसोय होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

****

ठाणे जिल्ह्यातल्या अंबरनाथ नगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत काँग्रेसकडून निवडून आलेल्या १२ नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत त्यांचा अधिकृत पक्षप्रवेश होणार असल्याची माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली. ठाण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. अंबरनाथच्या विकासासाठी आणि नागरिकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी हे सर्व नगरसेवक भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. हा निर्णय कोणत्याही सत्तालोभापोटी नसून, विकासाच्या मुद्द्यावर आधारित असल्याचं चव्हाण यांनी स्पष्ट केलं.

या नगरपरिषदेत भाजपसोबत अंबरनाथ विकास आघाडी स्थापन केल्यामुळे काँग्रेसनं त्यांच्या १२ नगरसेवकांना निलंबित केल्यानंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचं पक्षाचे नेते प्रदीप पाटील यांनी सांगितलं.

****

ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांचं आक पुण्यात दीर्घ आजाराने निधन झालं, ते ८३ वर्षांचे होते. पश्चिम घाटातील जैवविविधतेच्या संवर्धनासाठी त्यांनी दिलेलं योगदान अतुलनीय आहे. पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी त्यांनी तयार केलेला 'गाडगीळ अहवाल' पर्यावरण संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी दस्तऐवज ठरला. या अहवालातून त्यांनी विकासकामांमुळे पर्यावरणीय समतोल बिघडू शकतो, जीवसृष्टीसमोरील संकट वाढू शकतं असा गंभीर इशारा दिला होता. पर्यावरण क्षेत्रातील उत्तुंग कार्याबद्दल संयुक्त राष्ट्रांनी २०२४ मध्ये गाडगीळ यांना, 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' या सर्वोच्च सन्मानाने गौरवलं होतं.

****

राज्यात अवयवदानात पुणे विभागानं आघाडी घेतली आहे. गेल्या वर्षी राज्यात १५३ जणांचं मरणोत्तर अवयवदान करण्यात आलं. त्यातील ७९ जण पुणे विभागातले असून, त्यातून २०७ गरजू रुग्णांना जीवदान मिळालं. मूत्रपिंड, यकृत, फुफ्फुस, हृदय, अशा अवयवांचा त्यात समावेश होता. अवयवदानाबाबत जनजागृती वाढत असून, अनेक गंभीर रुग्णांना नवसंजीवनी मिळत आहे. तरी देखील गरजू रुग्णांची संख्या पाहता अधिकाधिक संख्येनं अवयवदानाचा संकल्प करण्याची गरज असल्याचं पुणे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीच्या समन्वयक आरती गोखले यांनी म्हटलं आहे.

****

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं रस्ते निर्मितीत गिनीज विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. २९ किलोमीटरचा रस्ता सलग २४ तासांत उभारण्याचा विक्रम प्राधिकरणानं केला आहे. यासाठी १० हजार मेट्रिक टनाहून अधिक डांबरयुक्त काँक्रीटचा वापर झाला. ३४३ किलोमीटर लांबीच्या या बंगरुळु-कडाप्पा-विजयवाडा महामार्गावर हा विश्वविक्रम झाला.

****

अंमली पदार्थ नियंत्रण विभागानं २०२५ मध्ये मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबवली, यात सुमारे दोन हजार कोटी रुपयांचे एक लाख ३३ हजार किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. यापैकी तीन हजार ८८९ कोटी रुपयांचे ७७ हजार किलोहून अधिक अंमली पदार्थ नष्ट करण्यात आल्याची माहिती या विभागानं दिली आहे. वर्षभरात नऊ परदेशी नागरिकांसह २६५ अंमली पदार्थ गुन्हेगारांना शिक्षा झाली. २०२४ मध्ये शिक्षेचा दर सुमारे ६० टक्के होता, तो २०२५ मध्ये जवळपास ६७ टक्के झाला आहे. फरार अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध ३७ इंटरपोल नोटीस जारी करण्यात आल्या आहेत, तर पाच फरार लोकांना भारतात परत आणण्यात यश आलं आहे.

****

दीव मध्ये दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धामध्ये काल महाराष्ट्राच्या कबड्डी संघानं विजयी घोडदौड कायम राखत उपांत्य फेरीत मजल मारली.

****